# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## गुरुवार, दिनांक ९ मार्च, २०२३

## (सकाळी १०-०० ते ११-४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(बुधवार, दिनांक १ मार्च, २०२३ व बुधवार दिनांक ८ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१)] —**

(१) **श्रीमती उमा खापरे,** श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री रमेशदादा पाटील, रामदास आंबटकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यातील खाजगी सावकारांच्या अत्याचाराला कंटाळून कित्येक शेतकऱ्यांनी जीवन संपवले असल्याने अनेक कुटुंबे रस्त्यावर येत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास येणे, तत्कालीन गृहमंत्री यांनी राज्यातील सावकारी मोडीत काढण्यासाठी आक्रमक भूमिका घेतली होती, मात्र आता पुन्हा एकदा सावकारांविरुद्ध पलूस तालुक्यात आणि राज्यात विशेष मोहीम राबवून शेतकऱ्यांना त्रास देणाऱ्या खाजगी सावकारांना पायबंद घालण्यासाठी आवश्यकता नागरिक व्यक्त करीत असणे, दुधोंडी येथील खाजगी सावकारांवर कुंडल पोलीस ठाण्यात सावकारीचा गुन्हा दाखल असतानाही पिडीताना धमकावले जात असतानाही शासनाचे दुर्लक्ष होणे, खाजगी सावकारांच्या अत्याचारातून शेतकऱ्याला न्याय देण्याची गरज असणे, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही."

**(शुक्रवार, दिनांक ३ मार्च, २०२३ व बुधवार, दिनांक ८ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (२) व (३) ] —**

(२) **श्री.सत्यजित तांबे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात मागील १० वर्षांमध्ये बाहेरच्या राज्यांमधून अथवा परदेशातून अनेक नवनवीन उद्योग व गुंतवणूक येणे, परंतू वारंवार हे उद्योग काही ठराविक औद्योगिक वसाहतींमध्ये आल्यामुळे त्याच औद्योगिक वसाहतींचा किंवा त्याच्या आजूबाजूच्या ठराविक शहरांचाच विकास होणे, (उदाहरणार्थ मुंबई, ठाणे, नागपूर, पुणे, छत्रपती संभाजीनगर) परिणामी राज्यातील इतर शहरांमध्ये व

अग्रिम प्रत

तालुका पातळीवरील औद्योगिक वसाहतीमध्ये विकासाचा समतोल न साधल्यामुळे या औद्योगिक वसाहतीतील परिसरातील उद्योजकांना कुठल्याही सोई सुविधा उपलब्ध न होणे, परिणामी तेथील उद्योजक सुशिक्षित बेरोजगार व युवक-युवती यांच्यामध्ये उदासीनता पसरणे, त्यामुळे राज्याच्या सर्व भागामधून बेरोजगार तरुण युवक युवतींना राज्यातील ठराविक भागामध्येच स्थलांतर होऊन त्या स्थलांतरामुळे नागरी विकासावर देखील ताण पडणे, त्यासाठी शासनाने राज्यातील मागील १० वर्षात औद्योगिक वसाहतीनुसार आकडेवारीची माहिती घेऊन शासनाने करावयाची कार्यवाही, तसेच विकासाचा समतोल साधला जावा, राज्यात येणारे नवे उद्योग व गुंतवणुक सर्वत्र जाण्याच्या दृष्टीने शासनाने त्वरित करावयाची कार्यवाही करून धोरणात्मक निर्णय घेण्याची नितांत आवश्यकता व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री.प्रसाद लाड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"ग्रामीण भागातून शहरात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना राहण्याची चांगली व्यवस्था होण्यासाठी शासनाने शासकीय वसतीगृह उभारले असून मुंबईतील चेंबूर नाका परिसरात १ हजार विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह बांधण्याचा निर्णय सन २००७ मध्ये घेणे, परंतु वसतीगृहाचे बांधकाम अद्यापपर्यंत पूर्ण झालेले नसणे, खाजगी विकासकाने सदर वसतीगृहाचे काम अर्धवट सोडल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना भाड्याने शिक्षणासाठी राहावे लागत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात आढळून येणे, शासकीय वसतीगृहाचे काम गेल्या १६ वर्षांपासून रखडले असल्यामुळे राज्य शासनाने लक्ष घालून सदर प्रकरणी तात्काळ वसतीगृहाचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी चेंबूर येथे शेकडो विद्यार्थ्यांनी माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात आंदोलन सुरू करणे, त्यामुळे शासनाने याची सखोल चौकशी करून तातडीने शासकीय वसतीगृह उभारण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

**(बुधवार, दिनांक ८ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (४) ते (७) ] —**

(४) **सर्वश्री सतिश चव्हाण,** विक्रम काळे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"वाळुंज (छत्रपती संभाजीनगर) सिडको महानगर — ३ करिता सिडको प्रशासनाने वाळुंज, जोगेश्वरी व रामराई येथील ४०० शेतकऱ्यांच्या १२५० एकर जमिनीवर सन १९८९ मध्ये आरक्षण टाकले असणे, सिडको प्रशासनाने शेतकऱ्यांना सन १९९२ मध्ये नोटीसा देऊन सदर जमिनीवर विकास कामे करु नये शिवाय इतर शासकीय कार्यालयांनीही सदर जमिनीवर विकास करण्यास कोणत्याही परवानग्या देऊ नये असे कळविले असणे, मागील ३० वर्षात सिडको

प्रशासनाने या नियोजित प्रकल्पाचा विकास करण्यासाठी काहीही कार्यवाही केली नसणे, व स्थानिक शेतकऱ्यांनाही विकास करु दिला नसणे, मागील ३० वर्षापासून शेतकऱ्यांच्या जमिनी पडीत असणे, त्यामुळे शेतकऱ्यांना कोणत्याच प्रकारचे उत्पन्न मिळत नसणे, वाळुंज एमआयडीसीची झपाट्याने वाढ होत असणे, वाळुज परिसरात कामगारांची संख्या मोठया प्रमाणावर असणे, हा प्रकल्प प्रलंबित राहिल्याने रहिवाशी क्षेत्रात वाढ होऊ न शकणे, सदर परिसरात जमिनीचे दर रु.२५००/- प्रति चौरस मीटर असणे, सदर प्रकल्प ३० वर्षापासून रेंगाळल्यामुळे किंमती वाढत गेल्या असल्याने शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) यांनी दिनांक १८.०२.२०१९ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत विषय घेवून वाळुंज महानगर प्रकल्प -३ हे सिडको अधिसूचित क्षेत्रातून वगळण्यासाठी ठराव केला असून शासनाची मान्यता प्रलंबित असणे, स्थानिक शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सिडकोने सदर जमिनीचे संपादन करुन शेतकऱ्यांना तात्काळ मावेजा द्यावा किंवा शेतकऱ्यांच्या जमिनीवरील आरक्षण उठवण्यासाठी होत असलेली मागणी यावर शासनाने केलेली कार्यवाही व प्रतिक्रिया."

(५) **श्री.सचिन अहिर**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई महापालिकेतून ४०० कि.मी रस्त्यांसाठी सुमारे ६ हजार कोटींचा झालेला घोटाळा, नव्या आर्थिक वर्षात विशेष निधी, राखीव निधी आणि अंतर्गत निधीतून २५ हजार कोटीहून अधिक निधी खर्च केला जाणे, जुन्या निविदा रद्द करुन पुन्हा नव्याने प्रत्येक कामासाठी स्वतंत्र निविदा काढण्यात आल्याने पुन्हा खर्च वाढणे, भायखळा येथील राणीबागेच्या विस्तारित जागेचे आरक्षण बदलणार असून त्यामुळे राणी बागेचा विस्तार रखडणार असणे, मुंबई सिमेंट कॉंक्रीटचे जंगल वेगाने वाढत असून त्या बांधकामासाठी लागणारे पाणी सहजासहजी मिळत नसल्याने टँकर माफिया मुंबईतील विहिरीमधून पाणी उपसा करणे, विशेष म्हणजे १९,००० विहिरींपैकी अनेक विहिरी नामशेष झाल्या असणे, काही वेळेस खडक फोडण्यासाठी पोकलेन व इतर यंत्रांनी फोडले जात असणे, अशा वेळेस पाण्याचे प्रवाह बदलतात व विहिरी कोरड्या पडण्याची असलेली शक्यता, भविष्यात पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई होण्याची शक्यता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून सखोल चौकशी करण्याची नितांत आवश्कता, याबाबत शासनाची प्रतिकिया व भूमिका."

(६) **श्री.अंबादास दानवे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

अग्रिम प्रत

"राज्यातील विशेषत: छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये काम करणारे अभियंते आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करुन शासनाच्या कामांमध्ये अनियमितता करण्याचा प्रयत्न करत असणे, काही ठिकाणी कामासंदर्भात निधी प्राप्त होऊनही कामे सुरु करण्यात आली नसल्याची बाब निदर्शनास आलेली असणे, शरणापूर ते साजापूर-करोडीपर्यंत असलेल्या ६ कि.मी. रस्त्याची दयनिय अवस्था झालेली असून गेल्या आठ वर्षामध्ये तीन वेळा निधी उपलब्ध करुनही रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास येणे, रस्त्यासाठी २८ कोटीच्या कामासाठी दिनांक ७ डिसेंबर, २०२२ पर्यंत निविदा मागविण्यात आल्या असून चार कंत्राटदारांकडून निविदा प्राप्त झालेल्या असूनही सदर निविदा उघडण्यात आलेली नसणे, छत्रपती संभाजीनगर शहरातील राज्य उत्पादन विभागाच्या इमारत व विश्रामगृहासाठी सुमारे १० कोटीची निविदा मागविण्यात आली असतानाही दहा महिन्यांपासून कोणताही निर्णय घेण्यात आलेला नसणे, याउलट पैठण येथील आरोग्य केंद्रासाठी दीड कोटींचा निधी मंजूर असतानाही ९९ लाखांच्या मर्यादेत कामे ही विनानिविदा करण्यात आलेली असणे, सदर कामे ही विहीत मुदतीत पुर्ण न केल्याने प्रलंबित असलेल्या कामांच्या खर्चाच्या रक्कमेमध्ये वाढ होत असल्याने शासनाचे आर्थिक नुकसान होत असणे, सदर कामांची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येणे, सदर मागणींबाबत शासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात येत नसल्याने स्थानिक जनतेमध्ये नाराजीची भावना निर्माण झालेली असल्याने सदर कामे पुर्ण करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने करावायची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(७) **प्रा.राम शिंदे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील साखर कारखान्यांनी दिनांक १५.१०.२०२२ पूर्वी ऊस गाळप हंगाम सुरू केल्यास संबंधित कारखान्यांच्या कार्यकारी संचालकांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश साखर आयुक्तालयाने जारी करणे, सदर आदेशानुसार सन २०२२-२३ या चालू वर्षाचा गाळप हंगाम दिनांक १५.१०.२०२२ रोजी पासून सुरू करावा असा निर्णय मंत्री समितीच्या बैठकीत झालेला असणे, पुणे जिल्ह्यातील बारामती अग्रो लि. शेटफळ, ता. इंदापूर या साखर कारखान्याने यावर्षीचा गाळप हंगाम दिनांक १५.१०.२०२२ पूर्वी सुरू करून कायद्याचा भंग केलेला असणे, त्यामुळे बारामती अग्रो लि. शेटफळ, ता. इंदापूर, जि.पुणे यांच्या कार्यकारी संचालकांवर मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधितांवर गुन्हे दाखल करून कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, उपमुख्यमंत्री, सहकार आयुक्त, पुणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली असून उपमुख्यमंत्री यांनी कारवाई करण्याचे आदेश सहकार

अग्रिम प्रत

आयुक्त, पुणे यांना देणे, आदेश देऊनही अद्यापपर्यंत कारवाई झालेला नसणे, त्यामुळे शासनाने याची तातडीने दखल घेऊन कारखान्यातील संबंधित दोषी संचालकांविरुद्ध गुन्हे दाखल करून करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.**

**तीन : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास).**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

**(बुधवार दिनांक ८ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने) —**

**(१) सर्वश्री अमोल मिटकरी, शशिकांत शिंदे, विक्रम काळे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १ वर उप मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

अकोला जिल्ह्यातील पातुर तालुक्यातील अंबाशी येथे राहणाऱ्या टायपिंग इन्स्टीट्युटच्या विद्यार्थ्यावर झालेल्या हल्ल्याबाबत.

**(२) सर्वश्री विक्रम काळे, शशिकांत शिंदे, अमोल मिटकरी, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २ वर उप मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

पारगांव (ता.दौंड, जि.बीड) येथील एकाच कुटूंबातील ७ व्यक्तींचा मृतदेह आढळून आल्याबाबत.

**(३) श्री,जयंत पाटील, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ३ वर सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) निवेदन करतील :-**

खरे अँड तारकुंडे इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीच्या मुळ रक्कमेवर ३०० कोटी रुपयांच्या व्याजाची रक्कम शासनाला द्यावी लागत असल्याबाबत.

अमुद्रित प्रत

**चार : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास).**

**पाच : शासकीय विधेयके —**

**(क) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार पुढे सुरु, खंडशः विचार व संमत करणे.**

**(१)** "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ — महाराष्ट्र कामगार कायदे (सुधारणा) विधेयक, २०२२"

---

**(२)** "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२."

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडशः विचार व संमत करणे.**

**(१)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ — महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३"

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ — महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३" विधानपरिषदेच्या १० सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ — महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

अग्रिम प्रत

**(२)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ – मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२३"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ – मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२३" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ –डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आणि महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ – डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आणि महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

## - मध्यंतर -

### (दुपारी २.०० वाजता)

**सहा : उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री सन २०२३-२०२४ चा अर्थसंकल्प सादर करतील.**

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ८ मार्च, २०२३

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.